!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

## शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# फटाका मार्केट दुर्घटनेतील नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत द्या

# शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**नवी दिल्ली दि.४ –** शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी आज दिल्लीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मुख्य सचिव स्वाधिन क्षत्रिय यांच्या समवेत फटाका असोसिएशनचे पदाधिकारी यांची भेट घडवुन आणली व संभाजीनगरातील जिल्हा परिषद मैदानावर फटाका मार्केटच्या अग्निकांडातील नुकसानग्रस्तांना मुख्यमंत्री सहायता निधीमधुन तात्काळ आर्थिक मदत देण्याची आग्रही मागणीचे निवेदन सादर केले यावेळी शिवसेना उपशहरप्रमुख माजी नगरसेवक गोपाळ कुलकर्णी, फटाका असोसिएशनचे अध्यक्ष माणिकचंद महतोले, कोषाध्यक्ष बाळुशेठ खंडेलवाल, सचिव गणेश चौधरी, विजय मंडप डेकोरेटरचे संचालक विजय शिंदे यांची उपस्थिती होती. यावर मुख्यमंत्री यांनी नुकसानग्रस्तांना शासन नक्की मदत करेल असे आश्वस्त केले.

संभाजीनगर (औरंगाबाद) येथील जिल्हा परिषद मैदानावरील फटाका बाजारात दि २९ ऑक्टोबर २०१६, शनिवारी अग्नितांडव झाले. यात फटक्याची १४० दुकाने आगीत खाक झाली. तसेच ११२ वाहनेही जळाली. यात एकूण १०,५८,३७,६७०/– रुपयांचे नुकसान झाल्याचा सविस्तर अहवाल अप्पर तहसीलदार संभाजीनगर (औरंगाबाद) यांनी जिल्हाधिकारी संभाजीनगर यांना सादर केला असल्याचे खासदार चंद्रकांत खैरे यांनी निवेदनात मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणुन दिले.शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या जिल्हा परिषद मैदानावर २८ वर्षांपासून दर दिवाळीला फटाका बाजार उभारण्यात येतो. मनपाच्या अग्निशामक दलाने यंदा येथे १८० दुकानांना परवानगी दिली होती. त्यापैकी १४० दुकाने उभारण्यात आली होती. फटाका बाजारास लागलेल्या भीषण आगीत सर्वच दुकाने जळून खाक झाली, तर मंडप साहित्यही भस्मसात झाली होती. येथे १४० दुकानांपैकी ५० दुकानदार मोठे व्यापारी होते. त्यांच्याकडे प्रत्येकी १० लाखांपर्यंतचे फटाके होते. ५० व्यापाऱ्यांकडे प्रत्येकी ५ लाखांपेक्षा कमी तर शिल्लक ४० व्यापाऱ्यांकडे प्रत्येकी १ लाखापेक्षा कमी फटाके होते. विक्रेत्यांचे सुमारे १२ कोटींचे नुकसान झाले. मंडपाचे २,३५,००,००० रुपयांचे व वाहनांचे दीड कोटीपर्यंत, असे एकूण सुमारे१५ कोटींचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असल्याचे सांगत संभाजीनगर (औरंगाबादच्या) इतिहासातील या सर्वात मोठ्या आगीने फटाके व्यापाऱ्यांचे 'दिवाळे' निघाल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

महापालिकेच्या अग्निशमन विभागाने अग्निशमन बंब फटका मार्केट परिसरात उभा ठेवणे क्रमप्राप्त होते.परंतू अग्निशमन विभागाने फटका असोशिएशन ला अग्निशमन बंब उपलब्ध करून न दिल्याने आग वेळीच विझवता आली नसल्याचा निदर्शनास आले हे खेदाने नमूद करीत असल्याचे सांगत या कामी संभाजीनगर महापालिकेचा कर्तव्यात निष्काळजीपणा झाल्याचे सकृत दर्शनी दिसून येतो. त्यात दोषींना कठोर शासन करण्याची मागणीही खासदार चंद्रकांत खैरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मुख्य सचिव स्वाधिन क्षत्रिय यांच्याकडे केली आहे.या दुर्घटने संदर्भात संभाजीनगर महानगरपालिकेचे महापौर व पदाधिकारी , औरंगाबाद मंडप वेल्फेअर असोसिएशन, औरंगाबाद फायर डीलर्स असोसिएशन, संभाजीनगर फायर डीलर्स असोसिएशन यांनी शासनाकडून मदत मिळून द्यावी यासंदर्भात दिलेली निवेदने व अप्पर तहसीलदार संभाजीनगर (औरंगाबाद) यांनी जिल्हाधिकारी संभाजीनगर (औरंगाबाद) यांना सदर केलेला नुकसान झाल्याचा सविस्तर अहवाल व वृत्तपत्र कात्रणे पत्रासोबत जोडलेली असुन या दुर्दैवी दुर्घटनेत नुकसान झालेल्या नुकसानग्रस्थांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून आपल्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून या दुर्दैवी दुर्घटनेतून बचावलेल्या नागरिक, व्यापारी, मंडपवाले या नुकसानग्रस्थांचा उध्वस्थ झालेल्या संसाराला पुन्हा उभारण्यासाठी तत्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी खासदार चंद्रकांत खैरे यांनी निवेदनाव्दारे मुख्यमंत्री, मुख्य सचिव, पालकमंत्री, शहरसचिवांकडे केली आहे.

**प्रसिध्दी प्रमुख**

योगेश पायघन / गणेश वाघ

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com yp4329@gmail.com 8421415255/7769052525